# DEPARTMENT OF PALI PRAKRIT

## About the Department

### पाली प्राकृत विभाग

पीपल्स वेल्फेअर सोसायटीची स्थापना सोसायटीचे अध्यक्ष डॉ . मधुकरराव वासनिक ,माजी- एम एल ए ,यांनी 1967 मध्ये अतिशय लहान जागेत आणि मोजक्याच विद्यार्थ्यांसह आपली पहिली शैक्षणिक संस्था स्थापन केली . पीपल्स वेल्फेअर यांच्या सक्षम मार्गदर्शनाखाली संस्थेने 4000 च्या वर विद्यार्थी संख्या असलेल्या बहुविद्याशाखीय महाविद्यालयातील हा एक पाली विभाग आहे.पाली हा विषय अतिशय लोकप्रिय विषय आहे . जे की पदवी आणि पदव्युत्तर स्तरावर शिकविले जाते . या पाली विभागात आर .टी .एम . नागपूर विद्यापीठाच्या इतर सर्व सलग्न महाविद्यालयापैकी सर्वाधिक विद्यार्थी संख्या आहे . आणि या विभागाकडे सर्वात मोठ्या ग्रंथालयापैकी एक छान ग्रथालय आहे.  या ग्रंथालयात पाली विषयांची  काही अत्यंत दुर्मिळ पुस्तकांचा संग्रह आहे .या विषयासाठी प्रगत संशोधन आणि अभ्यास केंद्र देखील आहे . हा विषय त्याच्या गौरवशाली भूतकाळासाठी ओळखला जातो . या महाविद्यालयात पाली विभागाची स्थापना 1974 पासून कार्यरत आहे  आणि 2002 - 2003 मध्ये एम .ए .पालीचा अभ्यासक्रम सुरू करण्यात आला बी कॉम ला कंपल्सरी पाली तर बीए ला पाली साहित्य शिकवल्या जाते . महाविद्यालयाच्या अध्यापन प्रक्रियेत सुधारणा करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांच्या दैनंदिन जीवनात जीवन जगण्याची कला अवगत करण्यासाठी पाली विभाग सतत मदत करीत असतो .

भारतातील शास्त्रीय भाषांपैकी एक पाली ने भारत आणि दक्षिण, दक्षिण-पूर्व आणि पूर्व आशियाई देश यांच्यातील भागीदारीत दीर्घ काळासाठी महत्त्वाची भूमिका बजावली. आशिया खंडातील सांस्कृतिक संवादात पालीचे महत्त्व लक्षात घेऊन नागपूर विद्यापीठाने आपल्या शैक्षणिक क्षेत्रातील उत्कृष्टतेसह पदव्युत्तर स्तरावर पाली हा स्वतंत्र विषय म्हणून आणला होता .

या विभागातील माजी पाली विभाग प्रमुख पाली विभूषण डॉ .बालचंद्र खांडेकर यांची या  पाली विभागात  पहिले प्राध्यापक म्हणूनयांची  नियुक्ती करण्यात आली होती , त्यांच्या नेतृत्वाखाली विभागाने बरीच प्रगती केली आहे . तेव्हा विभागाला वेगळेपण आणि महत्त्व प्राप्त झाले.  प्राध्यापक म्हणून केलेल्या त्यांच्या दहा वर्षांच्या सेवेत, पाली विभागातील काही शिक्षकांनी उच्च संशोधन पदव्या संपादन केल्यामुळे आणि काहींच्या सेवांची मागणी करून पाली विभाग समृद्ध आणि मोठ्या  प्रमाणात वाढला. विभागांचे प्रतिष्ठीत शिक्षक जसे डॉ . सुशीला पान्हेकर यासारख्या लोकप्रिय शिक्षकांचा वारसा या विभागाला लाभला . अशा या लोकप्रिय व्यक्तिमत्त्वांनी आपल्या समर्पित अध्यापनातून व

मार्गदर्शनाद्वारे विद्यार्थ्यांवर अविस्मरणीय अशी छाप सोडलेली आहे .पाली विभागातील प्राध्यापक नेहमीच संशोधनात आणि अभ्यासात व्यस्त असतात . आणि विद्यार्थ्यांसाठी अनेक साहित्याची निर्मिती करीत असतात .

याविषयावर विद्यार्थ्यांना नवीन प्रेरणा देण्यासाठी विभागातर्फे नियमितपणे नॅशनल आणि इंटरनॅशनल सेमिनार व्याख्याने आणि कार्यशाळा आयोजित केल्या जातात प्राध्यापकांनी तयार केलेले अभ्यास साहित्य तसेच विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या सेमिनार , कार्यशाळा यांचे व्हिडिओज यूट्यूब वर तसेच महाविद्यालयाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहेत . महाविद्यालयातील विद्यार्थी हे बहुतांशी मागासलेल्या समाजातील असून अनेक विद्यार्थी ग्रामीण भागातून येत असतात . त्यांना बुद्धाचा उपदेश , आणि पाली भाषेचे महत्त्व कळावे म्हणून विद्यार्थी केंद्रित अनेक कार्यक्रमाचे आयोजन विभागाकडून केले जाते . आणि अभ्यासाच्या सोयीसाठी संदर्भ ग्रंथाचा वापर करता यावा म्हणून विभागाचे स्वतंत्र ग्रंथालय आहे दरवर्षी एम .ए . पाली चे विद्यार्थी आर .टी .एम नागपूर विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत झळकतात . आमच्या विभागात सुवर्णपदक प्राप्त केलेले तसेच द्वितीय तृतीय मेरिट विद्यार्थी तसेच यूजीसी नेट पास झालेले अनेक विद्यार्थी आहेत . पाली विभागातील अभ्यासक्रमाला प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना विभागाकडून नेट-सेट आणि इतर स्पर्धा परीक्षेच्या अनुषंगाने मार्गदर्शन केले जाते .येथे अनेक महान विद्वानांनी या विभागाच्या विकासात आणि वाढीसाठी योगदान दिले .

## OUR MOTTO

## “बह ुजन हिताय बहुजन सुखाय”

### SUBJECT CONCERN OF THE DEPARTMENT:

**Pali & Prakrit for B.A, B.COM, M.A**

**2) B.A – Pali Litreture**

**3) B.Com – Compulsory Pali**

**4) M.A – Pali Litreture**

**5) UGC Sponsored Budhist Study Certificate**

## FACULTY IN THE DEPARTMENT



**Dr. Balchandra N. Khandekar**

Director, Pali & Dr. Ambedkar Thought

Research & Study Centre



**Dr. Pranoti Sunil Kamble**

Assistant professor, HOD of Pali department

Convenor- Buddhist study centre (UGC Sponsored)



**Dr. Pratibha B Pakhide (Retired)**

Assistant professor

Co-Convenor. Buddhist study centre (UGC sponsor)

## MERIT STUDENTS / ACHIEVERS:

| S N | Merit Student Name | Placed in Order of Merit | Year |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | Prem Kishor Janbandhu | $1^{st}$ | 2017 |
| 2 | Purushottam Sakharam Dongare | $3^{rd}$ | 2017 |
| 3 | Vasant Kumar Gyanappa Bellubi | $3^{rd}$ | 2019 |
| 4 | Rajendra Prakash Narnaware | $1^{st}$ | 2021 |
| 5 | Nileshkumar Lalchand Vaidya | $3^{rd}$ | 2021 |







## NET PASS STUDENTS

| S N | Name Of Student | Ugc –Net Passing Year |
|---|---|---|
| 1 | Rupesh Ganesh Nikose | July 2018 |
| 2 | Vasantkumar Bellubbi | July 2018 |
| 3 | Suryaji Shivaji Mote | June 2020 |





## Activities and photos





ध्यान साधना(Meditation) व व्यक्तिमत्व विकासावर (Personality Development) व्याख्यान 2017-18 (मोटिवेशनल थाई गुरु) प्रा. जागारो



जनतेचा महानायक

शुक्रवार, दि. २३ मार्च, २०१८

## व्यक्तिमत्व विकास म्हणजे भौतिक यश मिळविणे नव्हे - प्रा. जगारो सर

नागपूर/प्रतिनिधी

डॉ. मधुकरराव वासनिक पी डब्ल्यू.एस. कला व वाणिज्य महाविद्यालयातील पाली प्राकृत विभाग व वसंतराव नाईक कला व समाजविज्ञान संस्था या शासकीय महाविद्यालयातील पाली प्राकृत विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार दि. ११ रोजी महाविद्यालयात सिध्दार्थ सभागृहात ध्यान साधना व व्यक्तिमत्व विकास या विषयावर व्याख्यानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक पाली विभागातील विभाग प्रमुख प्रा. प्रणोती कांबळे यांनी केले. तर संचालन बी.ए.भाग -२ चा विद्यार्थी तोषित राऊत यांनी केले. या कार्यक्रमाला लाभलेले प्रमुख वक्ते (मोटीवेशनल गुरु-थाई) प्रा. जागारो सर होते. त्यांनी आपल्या व्याख्यानातुन विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध केले. त्यांनी विद्यार्थ्यांकडून ध्यान साधना आणि व्यक्तिमत्वाच्या विकासाकरिता काही प्रात्यक्षिक करवून घेतले आणि त्यातून कसा व्यक्तिमत्वाचा विकास होतो हे स्वतः अनुभवलेल्या अनुभवातुन पटवुन दिले. व्यक्तिमत्वाच्या विकासाकरिता एकाग्रता आनापनसती कशी गरज आहे आणि कशा पध्दतीने करावे याचे प्रात्यक्षिक करवून घेतले. व्यक्तिमत्वाचा विकास केवळ भौतिक यश किंवा भरपूर पैसा मिळविण्याची क्षमता किंवा नांव लौकीक मिळविण्याची क्षमता निश्चितच नव्हे तर, त्याचबरोबर चांगला जबाबदार नागरीक होणे. समाजाप्रती संवेदनशील बनने, शांत, स्वस्थ, आनंदी सकारात्मक आणि कणखर व्यक्तिमत्व बनने हे जास्त महत्वाचे आहे. चढ-उतार, यश-अपयश सहज स्विकारता येण्याची क्षमता मिळविणे महत्वाचे आहे. असे व्यक्तिमत्व विशिष्ट प्रयत्नांनी मिळविता येत. ते म्हणजेच ध्यान साधना होय. आणि हो ध्यान कसी करावी हे त्यांनी आपल्या व्याख्यानातून मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांना पटवून दिले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. बालचंद्र खांडेकर यांनी चित्त, चैतसिक मनाची एकाग्रता यांचे महत्व हे आपल्या अध्यक्षीय भाषणात पटवून दिले. कार्यक्रमाचे आभार शासकीय महाविद्यालयातील पाली-प्राकृत विभागाचे विभाग प्रमुख डॉ. मनोहर कुभांरे यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाला वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.





महाराष्ट्र टाइम्स । नागपूर । शुक्रवार, १२ ऑक्टोबर २०१८

### 'धर्मपरिवर्तन हे डॉ. आंबेडकरांचे महान कार्य'

नागपूर : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेले धर्मपरिवर्तन हे त्यांच्या जीवनातील नव्हे तर संपूर्ण विश्वातील अतिशय महान, ऐतिहासिक व तेवढेच पवित्र कार्य आहे, असे प्रतिपादन धम्मचारी मैत्रेयनाथ यांनी केले. डॉ. मधुकरराव वासनिक पी. डब्ल्यू. एस. महाविद्यालयाच्या पाली-प्राकृत विभागाने आयोजित केलेल्या 'बाबासाहेब आंबेडकर यांच्या दृष्टिकोनातील बुद्ध धम्म' या विषयावर व्याख्यान पार पडले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. यशवंत पाटील अध्यक्षस्थानी होते. प्रास्ताविक व परिचय विभाग प्रमुख प्रा. प्रणोती कांबळे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. प्रतिभा पखोड्डे यांनी केले. प्रा. ज्वाला डोहाणे यांनी आभार मानले.

व्याख्यान डॉ बाबासाहेब आंबेडकरांची धम्मदृष्टी (2018-19)मा .धम्मचारी मैत्री नाथ





सकाळ

कामठी रोड : बुद्धांचे उपदेश या ग्रंथाचे वितरण करताना प्रमुख पाहुणे.

## गौतम बुद्धांचे विचार देशाला प्रगतीकडे नेणारे : डॉ. चंद्रकीर्ती

नागपूर, ता. २० : तथागत बुद्ध यांच्या मानव कल्याणकारी, विज्ञानवादी आणि परिवर्तनशील विचारांची भारत देशाला गरज आहे. बौद्ध राष्ट्रांप्रमाणे भारताने जर बौद्ध विचाराला आत्मसात केले तर भारतही विकसित व प्रगतीकडे जाताना दिसेल, असे प्रतिपादन सम्राट अशोक सुभारती सेंटर फॉर बुद्धिस्ट स्टडीज मेरठ येथील भन्ते डॉ. चंद्रकीर्ती यांनी येथे केले.

डॉ. मधुकरराव वासनिक पीडब्ल्यूएस कला व वाणिज्य महाविद्यालय येथे पाली व डॉ. आंबेडकर विचारधारा विभागातर्फे आयोजित अनागरिक धम्मपाल जयंती व ग्रंथ वाटप कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी मनोज वासनिक होते. प्राचार्य डॉ. यशवंत पाटील, पाली व डॉ. आंबेडकर विचारधारा विभागाचे संचालक डॉ. बालचंद्र खांडेकर उपस्थित होते. संचालन प्रा. प्रणोती कांबळे यांनी केले. आभार डॉ. नागसेन लांडगे यांनी मानले. दरम्यान, बुद्धांचे उपदेश या हिंदी व इंग्रजी ग्रंथांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी उपप्राचार्य डॉ. नरेंद्र बागडे, प्रा. डॉ. प्रज्ञा बागडे, प्रा. आत्माराम पांडे, प्रा. डॉ. चंद्रशेखर पाटील, प्रा. डॉ. जयंत जांभूळकर यांनी सहकार्य केले.

Nagpur, Nagpur-Today
21/09/2019 Page No. 7

धम्मपड पाठांतर स्पर्धा धम्मपद ग्रंथ वाटप (2019-20)भंते चंद्रकिर्ती




भारतीय धार्मिक वैचारिक परंपरा अंतर्गत बुद्धधममचा स्थान आणि विकास व्याख्यान (2019-20 )डॉ सुखादेव थोरात




जॉन ड्युईडॉ आंबेडकर आणि व्यवहारवाद(2019-20)डॉ आर स्ट्रावूड.






# शांतता व सामाजिक सौहार्दला धर्मांधतेचा धोका असल्याने फक्त बुद्धाची करुणा जगाला वाचवू शकते: डॉ. नितीन राऊत

**दै.उद्‌घोष/प्रतिनिधी**

**नागपूर :**"धर्मांधता आणि कट्टरवादामुळे समाजातील शांतता व सौहार्दाला तडे जात आहेत. अशावेळी बुद्धाची करुणा जगात शांतता प्रस्थापित करू शकते, म्हणूनच आता जगाला बुद्धाच्या शिकवणीची नितांत आवश्यकता आहे, असे उदगार नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री आणि ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी ब्रह्म-विहार या विषयावर आयोजित आंतरराष्ट्रीय वेबिनारचे उद्घाटन करताना व्यक्त केले.

ब्रह्मविहार या बुद्धाच्या शिकवणीमध्ये चार सद्गुणांचे वर्णन केले आहे. जर लोकांनी हे सद्गुण आत्मसात केले तर समाजात शांतता व सौहार्द निर्माण होईल. सध्या जगात सगळीकडे अशांतता व हिंसाचार माजलेला आहे. कोरोना विषाणूच्या प्रादूभार्वामुळे सगळीकडे असुरक्षतेचे वातावरण निर्माण झाले असुन बुद्धाची शिकवण आपल्याला यातून मार्ग काढण्यासाठी मदत करू शकते, असे मत यावेळी त्यांनी व्यक्त केले.

बुद्ध धम्म व आंबेडकर-वाद हे मानवतावादी तत्वज्ञान आहे. त्यामुळे मानवजातीचे कल्याण करण्यासाठी व लोकशाही समाज निर्माण करण्यासाठी या तत्वज्ञानाची गरज आहे. सांप्रदायिकता, जातीयवाद व संकुचित विचारधारेमुळे जगापुढे आव्हाने निर्माण झाली आहे, असे मनोगत त्यांनी व्यक्त केले.

ते पुढे असेही म्हणाले की, 'अत्तदीप भव' ही बुद्धाची शिकवण असून प्रत्येकांनी आपला मार्ग स्वतःच निवडला पाहिजे. यासाठी आपण सदैव जागृत असले पाहिजे व स्वतःचे चित्त शुद्ध केले पाहिजे. एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीला शुद्ध करू शकत नाही. प्रत्येक व्यक्तीमध्ये बुद्धत्व असून प्रत्येक व्यक्तीला बुद्धत्व प्राप्त होऊ शकते. प्रत्येक माणूस जन्माने समान असून प्रत्येकाला सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे.

डॉ. आंबेडकरांनी भारतात बौद्ध धमार्चे पुनरुज्जीवन केल्यामुळे आपण त्यांचे फार ऋणी आहोत. त्रिपिटक यात बुध्द धम्माचे नियम व तत्व असून ते फार व्यापक व प्रचंड आहेत. परंतु बाबासाहेब आंबेडकर यांनी बुद्ध व त्याचा धम्म हे पुस्तक सामान्य माणसांना धम्म समजावे म्हणून लिहिले असून याचा धम्म समजून घेतांना खूप मदत होते. त्यामुळे आपण सर्वांनी हे पुस्तक वाचायला हवे, असे मत डॉ राऊत यांनी व्यक्त केले.

बुद्धानी देव, आत्मा व मोक्ष याचे अस्तित्व नाकारले आहे. मानव जातीचे कल्याण याच गोष्टीवर बुद्ध धम्म आधारलेला आहे. जीवनात दुःख आहे आणि ते दूर करण्याचा मार्ग बुध्दानी सांगितला आहे. चित्ताची शुद्धी करून व मनाला शांत करून हे आपल्याला साध्य करता येते, असे ते म्हणाले.

विधानपरिषदेचे माजी आमदार आणि पीडब्ल्यूएस महाविद्यालयाचे संस्थापक डॉ. मधुकर वासनिक यांच्या अध्यक्षतेखाली या आंतरराष्ट्रीय वेबिनारचे आयोजन करण्यात आले. मुख्य भाषण हे प्रा. डॉ.संघसेनसिंग यांनी नवी दिल्ली येथून केले. भंते आनंद, सरचिटणीस महाबोधि सोसायटी, बेंगलोर, आणि म्यानमारमधील भन्ते सेंग मुरंग आचारिया हे प्रमुख व्यक्ती होते. पालीभूषण डॉ. बालचंद्र खांडेकर, प्राचार्य डॉ. यशवंत पाटील आणि डॉ. सुदेश भोवटे हे वेबिनारचे संयोजक होते. डॉ. महेंद्र गायकवाड, कु. प्रणोती सहारे, सल्लागार श्री सुरेश पाटील, श्री सिद्धार्थ वाणी आणि डॉ जयंत जांभूळकर हे सहसंयोजक होते. या वेबिनारमध्ये जगभरातील विद्वान सहभागी झाले होते. मधुकरराव वासनिक पीडब्ल्यूएस महा-विद्यालयाच्या वतीने ह्या एक दिवसीय वेबिनारचे आयोजन करण्यात आले.

एक दिवसीय आंतरराष्ट्रीय वेबिनार (13 जून 2020-21) ऊर्जा मंत्री डॉ नितिन राऊत




अतिथि व्याख्यान बोद्ध धम्म आणि आधुनिकीकरण (2020-21 )कर्नाटक असिस्टेंट प्रोफेसर डॉ धम्मदीप वानखेडे




दोन दिवासीय राष्ट्रीय  वेबिनार पाली भाषा आणि बोद्ध पुरातत्व




बुद्धिस्ट मांनोविज्ञान या विषयावर व्याख्यान(2020-21) नुरोलोगिस्त डॉ संजय रामटेके







एक दिवसीय आंतरराष्ट्रिय कार्यशाला (2021-22) भंते सुमंगलो (विपस्सना सेंटर थायलंड )







वर्तमानातील शील मैत्री परमीताचे चे महत्व व उपयोगिता- डॉ. भंते राकेश आनंद



स्मार्ट क्लास




ई - लाईब्ररी भेट




दीक्षा भूमी


डॉ. मधुकरराव वासनिक
पी.डब्ल्यु.एस.कला व
वाणिज्य महाविद्यालय
कामठी रोड, नागपूर
पाली प्राकृत विभाग

नागलोक



ध्यान साधना